# वित्त विभाग, जिल्हा परिषद वाशिम

## रचना

मुख्य लेखा व वित्त अधिकारी
जिल्हा परिषद,वाशिम

उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी
जिल्हा परिषद,वाशिम

लेखा अधिकारी - १
जिल्हा परिषद,वाशिम

लेखा अधिकारी - १
जिल्हा परिषद,वाशिम

सहाय्यक लेखा अधिकारी (आस्थापना)
जिल्हा परिषद,वाशिम

सहाय्यक लेखा अधिकारी (अंकेक्षण)
जिल्हा परिषद,वाशिम

कनिष्ठ लेखा अधिकारी
जिल्हा परिषद,वाशिम

वरिष्ठ सहाय्यक (लेखा)
जिल्हा परिषद,वाशिम

कनिष्ठ सहाय्यक (लेखा)
जिल्हा परिषद,वाशिम

# नागरिकांची सनद
# वित्त विभाग, जिल्हा परिषद, वाशिम
# प्रस्तावना

वित्त विभाग हा जिल्हा परिषदेचा एक अत्यंत महत्वाचा विभाग आहे. जिल्हा परिषदेचा वार्षिक अर्थ संकल्प तयार करणे व तो अर्थ समितीच्या शिफारशीनुसार जिल्हा परिषदेच्या सर्व साधारण सभेमध्ये सादर करणे, जिल्हा परिषदेच्या आर्थिक बाबीवर सुक्ष्म लक्ष ठेवणे, अर्थोपाय स्थिती योग्य राहण्याच्या दृष्टिने आवश्यक उपाय योजना करणे, जिल्हा परिषदे मार्फत राबविण्यात येणाऱ्या जन कल्याणाच्या विविध योजना राबविण्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध असल्याचे खात्री करणे. तसेच जिल्हा परिषदेकडील विविध विभागाकडुन प्राप्त होणाऱ्या गटविमा योजनेची प्रकरणे, भविष्य निर्वाह निधी, निवृत्ती वेतन प्रकरणे, तसेच विविध योजनाचे, विकास कामाचे प्रस्ताव तथा प्रशासकीय व निविदा मंजुरीसाठी अभिप्रायाकरीता प्राप्त झालेल्या प्रस्तावावर शासन मार्गदर्शक सुचना, शासन परिपत्रके, शासन निर्णय व महाराष्ट्र जिल्हा परिषद लेखासंहिता १९६८ नुसार अभिप्राय देवुन सक्षम अधिकाऱ्याकडे पाठविणे.

जिल्हा परिषदेकडील वित्त विभागामार्फत नागरिकांना कोणती थेट सेवा पुरविली जात नाही तथापी वित्तीय सेवा विषयक बाबींच्या अनुषंगाने जिल्हा परिषदेकडील विविध विभागामार्फत उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे नस्ती, संदर्भ यांची तपासणी करुन अभिप्राय देणेची कार्यवाही वित्त विभागामार्फत केली जाते. याकरीता विषय निहाय कार्यसनाची निर्मिती करण्यात आलेली आहे.

उद्देश:- **१) विविध आर्थिक बाबी विषयक प्रस्तावावर अभिप्राय देणे:-** राज्य शासनाकडुन प्राप्त होणारे अनुदान व जिल्हा परिषद निधी यामधुन विविध विकास कामे जिल्हा परिषदेकडील विभाग मार्फत राबविण्यात येतात. सदर विकास कामे व योजना यांची देयके व प्रस्ताव विभागाकडुन प्राप्त झाल्यानंतर शासन मार्गदर्शक सुचना, शासन परिपत्रके, शासन निर्णय व लेखसंहिता नुसार मंजुर करणे व अभिप्राय देवून सक्षम अधिकाऱ्याकडे पाठविणे.

**२) निवृत्ती वेतन:-** जिल्हा परिषदेमधुन सेवानिवृत्ती झालेल्या कर्मचाऱ्यांचे निवृत्ती वेतन मंजुरीचे प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर सदर प्रस्तावाची तपासणी करुन प्रस्ताव परिपुर्ण व अचुक असल्यास मंजुरी करीता सक्षम अधिकाऱ्याकडे पाठविणे.

**३) मय्यत कर्मचाऱ्यांना प्रदानाबाबत:-** जिल्हा परिषद कर्मचारी मृत्यु पावल्या नंतर त्यांच्या वारसांना मिळणारे सर्व लाभ तात्काळ वित्त विभागाकडील प्रस्तावाची जेष्ठता यादी न पाहता मिळतील याची खात्री करणे.

४) **भविष्य निर्वाह निधी:-** जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधीमधुन अग्रीम धन काढण्यासाठी प्राप्त झालेले प्रस्ताव व देयकाची तपासणी करुन कर्मचाऱ्यांच्या खात्यावर शिल्लक रक्कम असल्यास महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम १९९८ मधील नमुद तरतुदी नुसार प्रस्ताव निकाली काढणे.

५) **गटविमा योजना:-** जिल्हा परिषद मधुन सेवानिवृत्त किंवा मय्यत कर्मचाऱ्यांचे गटविमा मंजुरीचे प्रस्ताव या विभागाकडे प्राप्त झाल्यानंतर प्रस्तावाची तपासणी करुन योग्यतेप्रमाणे निर्णय घेण्यासाठी प्रस्ताव सक्षम अधिकाऱ्याकडे पाठविणे.

६) **देयकाचे प्रदान RTGS व्दारे** - वित्त विभागामध्ये सादर होणारे प्रत्येक देयकाचे प्रदान RTGS व्दारे केले जात असल्यामुळे संबंधितांच्या खात्यात रक्कम तात्काळ जमा होते.तसेच अरोखिकृत धनादेश बाबत प्रश्न निर्माण होत नाही.

**विभागाचे नांव:- वित्त विभाग, जिल्हा परिषद, वाशिम**

**कार्यसुची वेळापत्रक**

| अ.क्र. | विभागाकडुन पुरविली जाणारी सेवा | आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर किती कालावधी सेवा पुरविली जाईल | सेवा पुरविणारा अधिकरी/कर्मचारी | सेवा विहित कालवधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्याकडे तक्रार करता येईल ते अधिकारी |
|---|---|---|---|---|
| १ | गटविमा योजना | ८ | उपमुख्य लेखा अधिकारी | मुख्य लेखा व वित्त अधिकारी |
| २ | भविष्य निर्वाह निधी | ८ | लेखा अधिकारी | उपमुख्य लेखा अधिकारी |
| ३ | निवृत्ती वेतन | ८ | लेखा अधिकारी | उपमुख्य लेखा अधिकारी |
| ४ | प्रस्तावावर अभिप्राय देणे | ३ | मुख्य लेखा व वित्त अधिकारी | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| ५ | जि.प. कर्मचाऱ्याची वैद्यकीय देयके नस्ती | ३ | मुख्य लेखा व वित्त अधिकारी | मुख्य कार्यकारी अधिकारी |

**वित्त विभाग,जिल्हा परिषद वाशिम**

**लेखा कर्मचारी आकृतीबंधाबाबत माहिती (संवर्गनिहाय)**

| अ.क्र. | संवर्ग | मंजुर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १ | सहाय्यक लेखा अधिकारी | १७ | १६ | ०१ |
| २ | कनिष्ठ लेखा अधिकारी | ०९ | ०७ | ०२ |
| ३ | वरिष्ठ सहाय्यक (लेखा) | २४ | १५ | ०९ |
| ४ | कनिष्ठ सहाय्यक (लेखा) | २७ | १७ | १० |
| | **एकुण** | **७७** | **५५** | **२२** |

**वित्त विभाग,जिल्हा परिषद वाशिम**

**माहितीचा अधिकार कायदा २००५ बाबत**

| सहाय्यक माहिती अधिकारी | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलिय अधिकारी |
|---|---|---|
| श्री प्रविण म.पंधारे<br><br>सहाय्यक लेखा अधिकारी<br>वित्त विभाग,जि.प.वाशिम | श्री नारायण ग.मसरे<br><br>लेखा अधिकारी<br>जिल्हा परिषद वाशिम | श्री व्यंकट जोशी<br><br>मुख्य लेखा व वित्त अधिकारी<br>जिल्हा परिषद वाशिम |